# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.11.2025** **वार:शनिवार**

---

1. **राष्ट्राच्या कल्याणासाठी स्वदेशी, योगाभ्यासासह नऊ निर्धार करण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन**
2. **निवडणुका जाहीर न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा पाळावी, सर्वोच्च न्यायालयाचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश**
3. **56 व्या इफ्फीचा गोव्यात रंगतदार समारोप, संतोष डावखर यांच्या गोंधळ या मराठी चित्रपटाला रौप्यमयूर पुरस्कार**
4. **राज्य सरकारच्या विविध सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणा आणि**
5. **11 जहाल नलक्षवाद्यांचे गोंदिया पोलिसांसमोर आत्मसमर्पण**

**<u>पंतप्रधान</u>**

राष्ट्राच्या कल्याणासाठी नऊ निर्धार करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलं आहे. कर्नाटकातील उडुपी इथल्या श्री कृष्ण मठात ते काल बोलत होते. नदीचं रक्षण, नैसर्गिक शेती, स्वदेशीचा वापर, योगाभ्यास, भरडधान्याचा आहारात समावेश, तेलाचा वापर कमी करणे इत्यादींचा या निर्धारांमध्ये समावेश आहे. केंद्र सरकारच्या अनेक उपक्रमांची प्रेरणा भगवद्गीतेतून घेतल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले.....

**साथियों भगवान श्री कृष्ण का पूरा जीवन गीता का हर अध्याय, कर्म, कर्तव्य और कल्याण का संदेश देता है। हम भारतीयों के लिए दो हजार चार्टीस का काल सिर्फ अमृतकाल ही नहीं विकसित भारत के निर्माण का एक कर्तव्य काल भी है। देश के हर नागरिक की हर भारतवासी की अपनी एक जिम्मेदारी है। हर व्यक्ति का हर संस्थान का अपना एक कर्तव्य है। हमारा हर प्रयास देश के लिए होना चाहिए। कर्तव्य की इसी भावना पर चलते हुए विकसित भारत का स्वप्न भी साकार होगा।**

यावेळी श्री कृष्ण मठात झालेल्या गीता पारायणात पंतप्रधान सहभागी झाले होते. पंतप्रधान काल गोव्यातील श्री संस्थान गोकर्ण पर्तगाली जीवोत्तम मठाच्या सार्ध पंचशतमहोत्सवातदेखील सहभागी झाले होते. यावेळी पर्तगाली इथल्या प्रभू श्री रामांच्या 77 फूट उंच पुतळ्याचं अनावरण आणि उद्यान तसंच संग्रहालयाचं उद्घाटन मोदी यांनी केलं.

**<u>जीडीपी</u>**

चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 8 पूर्णांक 2 दशांश टक्के नोंदवण्यात आला आहे. जीडीपीमध्ये 14 टक्के वाटा असलेल्या उत्पादनाच्या तिनही टप्प्यातील क्षेत्रांमधे या काळात 9 पूर्णांक 1 टक्के वाढ झाली आहे. निर्मिती क्षेत्राच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे एकंदर जीडीपी दरात वाढ झाली. जीडीपी वाढीचा हा दर उत्साहवर्धक असून त्यातून सरकारच्या विकासाभिमुख धोरणांचा आणि सुधारणांचा परिणाम दिसून आल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. देशवासियांचे कष्ट आणि कामसू वृत्ती यांचं हे फळ असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे.

**निवडणूक-सर्वोच्च न्यायालय**

राज्यातल्या काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना आधीच जारी झाली आहे, अशा ठिकाणी निवडणुका ठरलेल्या तारखांना घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी 21 जानेवारी रोजी होणार आहे. ज्या ठिकाणी 50 टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देण्यात आलं आहे तिथल्या निवडणुकांचा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर अवलंबून राहील असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, अद्याप निवडणुका जाहीर न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी 50 टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाची अधिसूचना जारी करू नये असे निर्देश न्यायालयानं राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. राज्यात एकंदर 246 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायतींच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाली असून त्यापैकी 40 नगरपरिषदा आणि 17 नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंह यांनी न्यायालयाला दिली. 29 महानगरपालिका आणि 346 पंचायत समित्यांच्या निवडणुका अद्याप जाहीर झाल्या नसल्याचंही त्यांनी सांगितलं. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य निवडणुकांची प्रक्रिया सुरू ठेवण्याचे आदेश दिले असले तरी या निवडणुकांचा निकाल न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अद्याप अनिश्चित राहिला असल्याची टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**निवडणूक सुट्टी**

राज्यात 2 डिसेंबरला नियोजित असलेल्या नगरपरिषद आणि नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर अशा ठिकाणी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी प्रचाराची मुदत देखील वाढवण्यात आली असून आता उमेदवारांना 1 डिसेंबरपर्यंत प्रचार करता येईल. निवडणुकांमुळं राज्यातल्या सर्व विद्यापीठांनी 1 ते 3 डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या सर्व परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्याचे निर्देश उच्च शिक्षण विभागानं दिले आहेत.

**मुख्यसचिव**

राज्य सरकारनं राजेश अग्रवाल यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती केली आहे. ते भारतीय प्रशासकीय सेवेच्या 1989 च्या तुकडीचे अधिकारी आहेत. विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार यांचा कार्यकाळ उद्या रविवारी संपणार आहे. त्यानंतर राजेश अग्रवाल पदभार स्वीकारतील.

**इफ्फी**

56व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची अर्थात इफ्फीची काल गोव्यात दिमाखदार सोहोळ्यानं सांगता झाली. 'अ यूजफुल घोस्ट' हा समारोपाचा चित्रपट दाखवण्यात आला. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन, सचिव संजय जाजू, महोत्सवाचे संचालक शेखर कपूर यांच्यासह विविध मान्यवर आणि मनोरंजन क्षेत्रातले कलाकार या समारोप सोहळ्याला उपस्थित होते. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**अभिनेते रजनीकांत यांच्या चित्रपटसृष्टीतल्या कारकीर्दीला 50 वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं इफ्फीच्या समारोप समारंभात रजनीकांत यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यंदाच्या इफ्फीमध्ये पहिल्यांदाच 50 महिला दिग्दर्शकांच्या चित्रपटांचं प्रदर्शन झालं, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांनी सांगितलं. यंदाचा सुवर्ण मयूर पुरस्कार दिग्दर्शक ऍश्लेघ मेफेअर यांच्या 'स्किन ऑफ युथ' या व्हिएतनामी चित्रपटाला देण्यात आला. दिग्दर्शनासाठीचा रजत मयूर पुरस्कार 'गोंधळ' या मराठी चित्रपटासाठी संतोष डावखर यांना देण्यात आला. माय फादर्स शॅडो या चित्रपटासाठी अकिनोला डेव्हीस ज्युनिअर यांना परीक्षकांचा विशेष पुरस्कार देण्यात**

**आला. सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून उबेमार रायस यांना तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून जारा सोफिया ऑस्टन हिला गौरवण्यात आलं. उत्कृष्ट वेब सीरिजचा पुरस्कार यंदा 'बंदिश बँडिट्स 2' ला देण्यात आला. तर प्रतिष्ठेचं आयसीएफटी-युनेस्को गांधी पदक, एरिक स्वेनसन दिग्दर्शित 'सेफ हाऊस' या चित्रपटानं पटकावलं.**

**सांस्कृतिक पुरस्कार**

2024 आणि 2025 या वर्षांसाठी राज्य सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणा काल सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केली. नाटक, संगीत, वाद्य संगीतासह लोककला, कीर्तन, वाद्यनिर्मिती, आदिवासी कला अशा विविध कलाक्षेत्रांमध्ये प्रदीर्घ काळ काम केलेल्या कलाकारांना तसंच युवा कलाकारांनाही सन्मानित केलं जाणार आहे. ज्येष्ठ अभिनेते अरुण कदम, अभिनेत्री तेजश्री प्रधान,मधुरा वेलणकर, अभिनेता भूषण कडू, गायक राहुल देशपांडे आणि भाग्येशमराठे यांचा पुरस्कारार्थींमध्ये समावेश आहे. मुंबईमध्ये होणाऱ्या सोहळ्यात हे पुरस्कार प्रदानकरण्यात येतील.

**महात्मा फुले पुण्यतिथी**

थोर समाज सुधारक महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल राज्यात सर्वत्र त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील फुले वाड्याला भेट देऊन महात्मा फुले यांना आदरांजली अर्पण केली. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीनं काल पुण्यात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना महात्मा फुले समता पुरस्कार प्रदान करण्यात आला. माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाहा यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. आर्थिक आणि शैक्षणिक विषमता दूर करण्यासाठी महात्मा फुले यांनी आयुष्य वेचलं. पण, दुर्दैवाने ती समस्या अजूनही कायम आहे अशी खंत थोरात यांनी यावेळी व्यक्त केली.पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे प्रबोधन पर्वाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**कडधान्य अभियान**

राष्ट्रीय अन्नधान्य आणि पोषण सुरक्षे अंतर्गत राज्यात यंदाच्या रब्बी हंगामापासून 'कडधान्य आत्मनिर्भर अभियान' राबवलं जाणार आहे. या अभियानाद्वारे सुधारित कडधान्य वाणांची लागवड, उत्पादन वाढ आणि उत्पादकता वाढीला प्राधान्य देण्यात येणार असल्याची माहिती पुणे कृषी आयुक्तालयातील विस्तार उपसंचालक रवींद्र पाटील यांनी दिली. खरीप आणि रब्बी हंगामात मिळून सुमारे 143 कोटी रुपये अनुदान या अभियानासाठी दिलं जाईल. देशाला डिसेंबर 2027 पर्यंत कडधान्यांमध्ये पूर्णपणे आत्मनिर्भर करणे हे या अभियानाचं प्रमुख उद्दिष्ट आहे. या अभियानात सहभागी होण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करणं आवश्यक आहे.

**नक्षलवादी-गोंदिया**

महाराष्ट्र-मध्यप्रदेश-छत्तीसगड भागातील नक्षलवाद्याच्या विशेष क्षेत्रीय समितीचा प्रवक्ता अनंत याच्यासह दरेकसा दलमच्या 11 जहाल नक्षलवाद्यांनी गोंदिया पोलिसांसमोर काल आत्मसमर्पण केलं. या सर्व नक्षलवाद्यांवर 89 लाख रुपयांचं बक्षीस होतं. या नक्षलवाद्यांकडून पोलिसांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त केला आहे. या गटाच्या समितीचा प्रवक्ता अनंत यानं 27 नोव्हेंबरला पत्रक जारी करून आत्मसमर्पणासाठी 1 जानेवारीची मुदत मागितली होती. मात्र छत्तीसगडचे गृहमंत्री विजय शर्मा यांनी विना विलंब शस्त्रे टाकून आत्मसमर्पण करण्याचा इशारा दिला होता.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान सूर्यप्रकाशयुक्त कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.